महाराष्ट्र शासन

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

दुरध्वनी क्रमांक - ०२४६२-२३४६१४

Email ID- dhonanded4@gmail.com

जा.क्र.जिपनां/आरोग्य/आस्था-१/ /२०२४

दिनांक २९/०३/२०२४

प्रति,

----------------------------------------

----------------------------------------

**विषय:- प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाच्या सरळसेवा पदभरती - २०२३** शैक्षणिक / व्यवसायिक / अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक मुळ कागदपत्रे पडताळणी करिता दिनांक ०५/०३/२०२४ रोजी उपस्थित राहणे बाबत.

**संदर्भ:-** १.प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी IBPS कंपनी मार्फत ऑनलाईन घेण्यात आलेली परिक्षा दिनांक ०२/११/२०२३

२. IBPS कंपनी मुंबई यांचे कडून प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाची प्राप्त झालेली एकत्रित गुणवत्ता यादी.

३. प्रस्तुत कार्यालयाकडून दिनांक १६/०२/२०२४ रोजी प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाची भरती - २०२३ करिता प्रसिध्द केलेली एकत्रित गुणवत्ता यादी.

४. जिल्हा निवड समिती नांदेड यांच्या मान्यतेने दिनांक २९/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली गुणानुक्रमे कागदपत्रे तपासणीसाठी बोलवावयाचे उमेदवारांची यादी.

जिल्हा परिषद नांदेड सरळसेवा भरती - २०२३ अंतर्गत प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी ऑनलाईन परिक्षा दिनांक ०२/११/२०२३ रोजी घेण्यात आली आहे. संदर्भ क्र.(०२) अन्वये IBPS कंपनी कडून प्राप्त निकाल संदर्भ क्र.(०३) अन्वये जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला आहे. संदर्भ क्र.(०४) अन्वये प्रवर्ग निहाय गुणानुक्रमे कागदपत्रे तपासणीसाठी बोलाविण्यात येणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आरोग्य पर्यवेक्षक या पदाच्या भरतीसाठी उमेदवारांची शैक्षणिक, व्यवसायिक (तांत्रिक अर्हता) व अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्रे / दस्ताऐवज तपासणी / पडताळणी दिनांक ०५/०३/२०२४ मंगळवार रोजी सकाळी १०.०० वाजता **कै.यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, नांदेड** येथे करण्यात येणार आहे.

तरी आपण कागदपत्रे तपासणीसाठी आवेदन पत्राची प्रत तसेच जाहिरातीमधील परिच्छेद क्र.(१९) मध्ये नमूद केलेली प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठीचे सर्व शैक्षणिक, व्यवसायिक (तांत्रिक अर्हता) व अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्रे व त्यांची एक छायांकित प्रत स्वयं साक्षांकित केलेल्या प्रतीसह दिनांक ०५/०३/२०२४ मंगळवार रोजी सकाळी १०.०० वाजता **कै.यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, नांदेड** येथे न चुकता उपस्थित रहावे. मुळ कागदपत्रे / दस्तऐवज तपासणी / पडताळणी करिता गैरहजर राहिल्यास, गैरहजर राहणा-या उमेदवारांनी निवड प्रक्रिया संबंधात कोणताही दावा करता येणार नाही, किंवा हक्क सांगता येणार नाही. यांची नोंद घेण्यात यावी.

**सोबत:- आवश्यक कागदपत्रांची यादी.**

O/C

क.स. / अधिक्षक / क.अधि. / प्रआधि

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
जिल्हा परिषद, नांदेड

**प्रतिलिपी**

१. मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(साप्र), जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव.

O/C

क.स. / अधिक्षक / क.अधि. / प्रआधि

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
जिल्हा परिषद, नांदेड

# सरळ सेवा भरती - २०२३
# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड
## पदाचे नाव:- प्रयोगशाळा तंत्रज्ञ
### कागदपत्रे पडताळणी वेळेस विहित मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करावयाची यादी.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | उमेदवारांनी ज्या पदासाठी आवेदन पत्र भरले आहे त्याची छायांकित प्रत |
| २ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयं घोषणापत्र |
| ३ | सर्व शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४ | वयाचा पुरावा |
| ५ | जन्माचा पुरावा |
| ६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ७ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांच्या संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र |
| ८ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (चालू आर्थिक वर्षातील) |
| ९ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १० | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११ | खेळाडूसाठी आरक्षणासाठी पात्र असल्यास पुरावा |
| १२ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १३ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४ | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १८ | पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २० | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २१ | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २२ | व्यवसायिक / तांत्रिक / अनुभव प्रमाणपत्र |
| २३ | उमेदवारांचा ओळखपत्रे (आधार कार्ड / पॅन कार्ड / मतदान कार्ड) |
| २४ | उमेदवार शासकिय कर्मचारी असल्याचा नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेले परवानगी पत्र |
| २५ | उमेदवाराचे स्वत:चे छायाचित्र (फोटो) |

### प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी लागणा-या इतर कागदपत्रे / दस्तऐवज यांची यादी

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | मुख्य विषय म्हणुन भैतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र अथवा जिवशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र अथवा प्राणीशास्त्र किंवा सुक्ष्मजिवशास्त्र या विषयासह विज्ञाण विषयामध्ये पदवी |
| २ | परंतु हाफकीन संस्थेच्या वेज्ञकिय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रामध्ये पदविका . |